म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७२८
१९३०
REFBK-0004235
REFBK-0004235

यशवन्त

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०३९
ठाणे

## मण्डळाचीं पुढील पुस्तकें

# काञ्चनगङ्गा

कवि **गिरीश** यांचा निवडक

**स्फुट कविता-सङ्ग्रह**

पृष्ठें १५०   किंमत १॥ रुपया

**ता. २ मार्च १९३० रोजीं प्रसिद्ध होईल.**

REFBK-0004235
REFBK-0004235

# मनोरमा

कै॰सौ॰ **मनोरमाबाई रानडे**, बी. ए. यांचा

**निवडक कविता-सङ्ग्रह**

**मण्डळाचें सतरावें पुस्तक म्हणून लवकरच**

**प्रसिद्ध होईल.**

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

| | |
|---|---|
| किरण (पद्य)–मण्डळ | ०४ |
| काव्यविचार (गद्य)–मण्डळ | १ |
| उषा (पद्य)–मण्डळ | ०१२ |
| मधुमाधव (पद्य)–घाटे व मा. जूलियन् | ०१२ |
| शलाका (गद्यपद्य)–मण्डळ | १ |
| विरहतरङ्ग (पद्य)–माधव जूलियन् | ०८ |
| कला (पद्य)–गिरीश | ०६ |
| नाट्यरूप महाराष्ट्र (गद्य)–घाटे | १ |
| छन्दोरचना (गद्य)–प्रो० पटवर्धन | २ |
| प्रभा (गद्य-पद्य)–मण्डळ | ०८ |
| सुधारक (पद्य)–माधव जूलियन् | १०८ |
| आम्बराई (पद्य)–गिरीश | १ |
| यशोधन (पद्य)–यशवन्त | १०८ |
| उमर खय्याम (पद्य)–प्रो० पटवर्धन | १०८ |
| भावमन्थन (पद्य)–यशवन्त | ०८ |

पत्ताः—४६१ शनवार, पुणें २.

नं. 382



[ भाषान्तर, पुनर्मुद्रण वगैरे सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

प्रकाशक—**गणेश महादेव वीरकर,**
मालक, **गणेश महादेव** आणि **कम्पनी,**
सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक—**अनन्त सखाराम गोखले,**
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें २.

सं. [redacted] ३८२

रविकिरण-मण्डळाचें पन्धरावें पुस्तक

# भावमन्थन

दा. क्र. ४२३५

यशवंत

[ सदस्य, रविकिरण-मण्डळ, पुणें ]

फेब्रुवारी—१९३०

किम्मत ८ आणे

## यशवन्तकृत—

**मित्र-प्रेम-रहस्य—**

मित्र-निधनांवरीलं शोक-गीत. किं. ४ आणे.

**यशवन्ती—**

स्फुट-कविता-सङ्ग्रंह. किं. १० आणे.

**यशोधन—**

यांत 'इन्दुकला' आणि इतर उत्कृष्ट कविता यांचा सङ्ग्रह केला आहे. किं. १॥ रु.

[ पहिली आवृत्ति संपली असून दुसरी छापत आहे.]

**भावमन्थन—**

एक सुनीतमाला आणि नवीन निवडक गीतें. किं. ८ आणे.

**बन्दीशाळा—**

एक खण्डकाव्य; लवकरच तयार होईल.

# अनुक्रमणिका

क्र. ३८२

| | |
|---|---|
| भावमन्थन | १४ ते २८ |
| पाणबुड्या | २९ |
| आग | ३० |
| यशवन्त | ३१ |
| सङ्कोच | ३३ |
| बाणा | ३४ |
| वृथा निर्माल्य | ३६ |
| बोगद्यांत | ३७ |
| आशीर्वाद | ३९ |
| सम्पादणी | ४१ |
| बाणांच्या शय्येवर | ४३ |
| आतिथिदेवा | ४५ |
| रे पतङ्ग | ४६ |
| कुरकूर | ४८ |
| सोड शिथिलता | ५० |
| माझे धनको | ५१ |
| कल्पलतेस— | ५३ |
| मायाविनीस— | ५५ |
| कधिं येशिल ? | ५६ |
| महाराष्ट्र-गीत | ५८ |

समर्पणपत्रिका

प्रिय बन्धु

चि० आप्पा-विनू व भास्करभाऊ यांस

"भावमन्थन" समर्पण करतांना—

दावाया उकलूनिया स्वहृदया श्रीरामदूतापरी
हातामाजि जरी प्रभाव नच या, तो पाहिजे कां परि ?
नाहीं पाहत का तुम्ही दर दिनीं – वर्षांनुवर्षें उभे
वारा पाउस ऊन साहुनि, तयांमाजीं वडाचीं मुळें
जावोनी दृढ खोल, ते खिळखिळे भङ्गोन होती तट;
तैशी हादरली परिस्थितिबळें माझीहि शान्ती धृति.
तेणें तोल सुटून बोल कटुसे आले चुकोनी जरी
प्रेमाच्या सुकल्या मदीय सरिता, मानूं नका, अन्तरीं.

मकरसङ्क्रान्त
१८५१

श्री

## मराठी वाचकांचे सेवेसी

विनन्ति विशेष—

" यशोधन "ची पहिली आवृत्ति अवघ्या आठ महिन्यांतच खलास झाली याबद्दल मी आपला अत्यन्त ऋणी आहे. यशोधनाच्या व्यापांतून अपेक्षेपेक्षां लवकर मुक्त झाल्यामुळें प्रस्तुत " भावमन्थन " प्रकाशित करण्यास मला अधिक उत्साह वाटत आहे. यशोधनाप्रमाणें किम्बहुना अधिक उत्सुकतेनें प्रस्तुत पुस्तकांचाही आपणांकडून स्वीकार व सत्कार होईल अशी आशा आहे.

" भावमन्थन " या शीर्षकाखालीं प्रथमतःच देण्यांत आलल्या सुनीत-गुच्छाला एका तीर्थस्वरूपिनीचा पुण्य-परिचय व मायापांखर हीं कारणीभूत झालीं असून, त्यांपैकीं बहुतेक सुनीतें सन १९२२ सालींच लिहिलीं गेलीं आहेत; तथापि त्यांच्या प्रकाशनाचा योग मात्र आज अर्ध्या-अधिक तपावधीनन्तर येत आहे. आजही तीं अलगपणें प्रसिद्ध न करतां त्यांच्याबरोबर आणखी कांहीं स्फुट कविताहि प्रसिद्ध करीत आहे. भावनेच्या मन्थनांतूनच भावगीतांचा उद्भव होत असतो. तेव्हां विशिष्ट सुनीतमालेला दिलेला " भावमन्थन " हा मथळा बाकीच्या गीतांनाही यथार्थतेनें लागू पडण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

" यशोधन " व " भावमन्थन " या पुस्तकांच्या सुन्दर सजावटीचें सारें श्रेय श्री० आप्पासाहेब गोखले यांचेकडे आहे. ते ज्या आपुलकीनें माझें काम करतात ती स्नेहजन्य असल्यामुळें आभारातीत आहे.

असो. " यशोधन "ची दुसरी आवृत्ति लवकरच प्रसिद्ध होईल. तत्पूर्वी प्रस्तुत " भावमन्थन " आपल्या कृपादरास पात्र होवो हीच प्रभुचरणीं प्रार्थना.

रिफॉर्मेटर स्कूल,
पुणें, ( न. ७).
मकरसङ्क्रान्त, १८५१

सर्वांचा कृपाभिलाषी
यशोधन

No sooner had I stepped into these pleasures.
Than I began to think of rhymes and measures.
The air that floated by me seemed to say
"Write! thou wilt never have a better day."
And so I did

—KEATS.

# भावमन्थन

भक्तीचिया जलनिधीमधिं जन्म पावें
कैसें परि प्रगट हृद्गत तें करावें?
माझा स्वभाव बुजरा, मज ना धिटाई
सङ्कोचवृत्ति रसनेस जडत्व देई.
मीं अङ्गिकार लिपिचा म्हणुनीच केला.
ही गुम्फिली नव चतुर्दशरत्नमाला
अन्तस्थ शुद्धि हिजला परि लाभली कां
ही एक उद्भवतसे मनिं मात्र शङ्का
मेघांतुनी उतरती विमलाम्बुधारा
येतो नदीस परि पूर गढूळ सारा
संसर्गदोष मग वारिधि वारितो तो
मी न्याय पायिं तव मागुं नयेच का तो?

उष्ट्या चुळींत अभिषेक रुचे शिवाला
सद्भाव भक्तमनिंचा कळतो प्रभूला.

काव्य ३०२



१

एकान्तीं हृदयामधीं जमतसे चिन्ता-घनांचा थवा
दुर्दैवी मज मानवा करमतें कोठेंहि ना जेधवां
येतों दर्शन घ्यावया, निवळतें चित्तांतलें काहुर
योगक्षेम विचारिसी, जग दिसे मातें तदा सुन्दर.
चालावीच तुझी अखण्डितपणें सम्भाषणाची सुधा
जैशी प्राशितसे चकोर विधुची मीं तेंवि प्यावी सदा
आशा हीच मनीं. सरस्वति तुझ्या जिव्हेवरी नाचते
ती वैराग्य-विचार-पङ्क्ति वदनीं साधूपरी शोभते
श्रीअम्बा कुलदेवताच तुझिया देहामधीं नान्दते
साक्षात्कार असा मला घडतसे; मद्बुद्धि विश्वासते
यासाठीं चरणीं तुझ्या निवसती माझ्या मनःकामना
वेडया भक्तिमुळें पिसें धजतेस त्वत्पादसंवाहना

ही पूजा करुं दे मला; धरुं नको देवी, अबोला असा.
कां माझी करिसी उगाच फजिती लावून मातें कसा ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नोंद नं. ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ..........

२

प्यालों स्तन्यसुधा जिची शिशुपणीं, अङ्कीं जिच्या खेळलों,
'राजा, पोपट, कोकरू' मुखिं जिच्या नामीं अशा घोळलों.
ताई, ताइत, तन्मणी, कधिं जिचा मी वाघही दाण्डगा
'आला चोर दह्या-तुपावरि' वदे लाडांत जी 'लाण्डगा'
पुण्डावा करितां हुरूप चढला जीच्या शिव्यांनीं मला
झाल्या गोड शिव्याच त्या, मज तसा खाऊहि ना लागला.
स्वाद्वन्नीं रसना सदाच विटली घेतां मुके सारखे
साङ्गातीं मम लोटितां प्रहरही जीला उणें कौतुकें
देहीं मूर्तिमती जिच्या विहरती श्रीऋद्धिसिद्धी सदा
जी सेवेस उभी सदा निरलसा मोदें मनःकामदा
माता ती शिशुदेवता परजगीं गेल्या दिसापासुनी
गेहीं भीषणता, उदासिनपणा चित्तीं वसे दाटुनी
ह्या जन्मीं फिरुनी न शैशवसुखें मातें जरी लाभणें
माता लाभसि तूं, न कांहिं तुझिया तीर्थस्वरूपीं उणें

३ ═══

सौन्दर्ये भवतीं कितीक दिसतीं हीं चालतीं बोलतीं
त्यांना पाहुनि तेव्हढ्याच पुरती गुङ्गून जाते मति
सौन्दर्यांत तुझ्या परन्तु दिसुनी दिव्यत्व आलें मला
सौन्दर्यासहि भूषवी अधिक जें तें आढळे दृष्टिला.
काव्यांच्या शिखरीं गुलाब डुलुनी हासे, जनां हासवी.
त्याची याकरितांच काय जनता आलापिते थोरवी ?
त्याचा रङ्गहि लोभनीय, परि तो नोहे तया भूषण;
सौन्दर्याहुनि तत्सुगन्ध सकलां टाकीतसे मोहुन.
थोडीं काय फुलें जगांत फुलतीं काव्याकुव्यांच्या घरीं ?
त्यांच्या रङ्गित वैभवांत खुलतें सौन्दर्य त्यांचें, परि–
त्यांचा तो भपका भिकार गमतो, लाभे न त्यां मान्यता;
सौन्दर्यासह सद्गुणांस मिळते लोकीं शिरोधार्यता !

सौन्दर्या अवलोकितां तव पदीं बैसून निर्हेतुक
पावित्र्यें तुझिया मला बनविलें देवी तुझा पूजक.

४

झाला वाल्मिकि थोर काव्यरचिता मारेकऱ्याचा कसा,
मार्कण्डेय गतायु तो परि चिरञ्जीवित्व पावे कसा,
कैसे प्रस्तर सागरांत तरले, झाली शिळा गौतमी,
तो गोवर्धन लीलया उचलिला—गोष्टी न ऐशा कमी.
स्पर्शानें परिसाचिया घडतसे लोखण्ड सोनें कसें
पापक्षालन केंवि गाङ्ग-सलिला सम्मार्जुनी होतसे
देवांचे अवतार केंवि घडले या मृत्युलोकावरी
पाहोनी तुजला क्षणीं पटतसे; शङ्का नुरे कोठली.
होतों मी दुबळा, अनाथ, अगदीं वेडा, खुळा, पाङ्गळा
होतों मानित पात्रता लव न या लोकीं जगाया मला.
आधाराविण रज्जुच्या भटकते जैशी नभीं वावडी
होतें जीवित त्यापरीच;—बसली आतां परन्तू घडी.
येथोनी रमणीयता, मधुरता येईल मज्जीविता
लाभे प्रेमळ—भाग्य थोर म्हणुनी—मातें नवी देवता.

९

त्वन्मैत्री मज लाभली, गमतसे आलें मला वैभव;
हा निर्लेप सुखोपभोग परि दे भीतीप्रती उद्भव.
हेवेखोर जगांत फार; न तयां कोणी सुखी पाहवे.
घेतों घास सुखांत—सज्जन असो—त्यांना न तें साहवे.
कानांचा खलसर्प घेतिल तुझ्या चावा जरी एकदां
द्वेषाची तुझिया गदा मम शिरीं बैसेल वेगें तदा
ऐशी भीति कधीं कधीं मम मनीं डोकावते अन्धुक
होई धस्स तदा उरामधिं, कुणी कीं रोखितें बन्दुक.
शत्रू सङ्गरिं छातिठोक पुढतीं येवोत कोणी किती
त्यांना मारिन ठार वा झगडतां येईल मातें मृति
पर्वा ती न; परन्तु विघ्नसुखि हे शत्रू महाघातक!
सत्प्रेमीं विष कालवून करिती पाडाव; ते जाचक
छे! त्यांचे धरुं कां वृथा भय? नको साशङ्क होणें मनीं!
सर्पाचा विषबिन्दु टाकिल सुधासिन्धूस का नासुनी?

६

आहों बोलत तूं नि मी, बघुनियां होते टवाळी जनीं
चित्तामाजि तिचा विषाद परि तूं मानूं नको स्वामिनी !
सत्याचा अपलाप नित्य करुनी फैलावणें भोंवतीं
या धन्द्यांत टवाळखोर अपुली सारी मती योजिती.
येती बाण्डगुळें, न हें विदित का आम्राचिया फान्दिला ?
पक्षी गोड फळांस टोंचिति सदा हें का न ठावें तुला ?
उद्यानीं दिसती सुवासिक फुलांमाजी कृमी-कीटक
पावित्र्यासहि देवि, मार्ग जगतीं नाहींच निष्कण्टक.
डौलानें गजराज जाइ पुढतीं; भुङ्कोत कुत्रीं पथीं
घों घों घुङ्गुरटीं करोत दुबळीं, नाहीं खगेन्द्रा क्षिती.
पाप्यांना विमलांत पाप दिसणें हा दोष तद्दृष्टिचा
सत्यान्वेषण सज्जनां समजतें—मानूं तयांच्या वचा.

भूपृष्ठीं विमलाम्बुसिञ्चन घडे काळ्या पयोदांतुनी
पावित्र्यस्तुति होइ एकपरिनें नीच--प्रलापांतुनी

७

देवा! कायमचेंच का मम गृहीं दारिद्र्य हें कोन्दलें?
आपत्तींत मलाच कां प्रभुवरा! त्वां एवढें घेरिलें?
माझें जीवित तेवढेंच सदया! केलें सहारा तुवां
या जन्मीं नाशिबीं नसेचि मज कां बापा सुखाची हवा?
मातें कां अमक्यापरी न दिधलें ऐश्वर्य लक्ष्मीधवा?
त्याच्या मानमरातबास कधिं मी पोंचेन कां राघवा?
केल्या यापरि याचना निशिदिनीं दारीं दयासिन्धुच्या
लागेना परि दाद; रोष नशिबीं कां तेवढा आमुच्या?
ऐसा त्रासुनि जेधवां बहु मनीं दैवास मी निन्दितों
देवी! आठवुनी तुला, स्थिति पुन्हा न्याहाळुनी पाहतों
येई आढळुनी तदा मज कुठें कांहींच नाहीं उणें;
स्वर्गद्वार खुलें दिसे, गमतसे हें धन्य माझें जिणें

देवी! आठवुनी कृपा बघतसें विश्वाकडे जेधवां
आनन्दून जगत्त्रयाधिपतिच्या धिक्कारितों वैभवा.

८

नाहीं सुन्दरता कुठें ? अणुअणू शोभे सबाह्यान्तर
पक्ष्यांचीं घरटीं, हिम, स्फटिक वा पुष्पें फळें सुन्दर
कोणी मातिंत कोरितो, स्वसदना शङ्कूपरी कीटक
सृष्टी शिल्पकलापटुत्व, जरि तें साधें, मनोवेधक.
जेथें शिल्पकलाच एकवटली, सौन्दर्यसीमा पुरी
तो हा ताजमहाल भारतहिरा कालिन्दितीरावरी
येते त्यास पहावयास जनता पांचींहि खण्डांतुनी
होते विस्मित, 'धन्य धन्य' निघती उद्गार तोण्डांतुनी
शोभे ताम्बुस अम्बुजासम अहा अस्तोदयीं भानुच्या
चान्दीची प्रतिमाच कीं हिमगिरी कान्तीमधें इन्दुच्या
काळोखांत दिसेल अन्धुक जरा कीं देवदूतापरी
तो केव्हांहि, कसाहि, कोठुनि पहा; त्याची न कोणा सरी.
नाहीं तो जरि पाहिला, तरि तुझी प्रीती तशी मानितां
अन्तश्चक्षु नवी नवी अनुभवी सौख्यासवें चारुता.

९

दिव्य-प्रीति-सुधातुषार रचुनी जें जाहलें स्मारक
तो हा ताजमहाल-वैभवबळें थाटे मनोमोहक
लोकांची क्षणभङ्गुरा बघुनिया लीला अशी, हासुन–
बोले काळ मनांत "ही हि सहजीं केव्हां तरी नाशिन!"
काळानें असतील कैक असलीं लाथाडिलीं स्मारकें
त्याला नाहिं दया, जुमानित न तो हीं मानवी कौतुकें.
काळाच्या जुलमीपणांत भलतें कांहीं जरी जाहलें
हें चित्तांतुनि भीति-बीज म्हणुनी काढून मीं टाकिलें.
प्रीतीचें मनिंच्या स्वरूप अवघें न्यारेंच देवी! असे.
'सीतेचा हनुमान' हाच मजला दृष्टान्त मी घेतसें.
देवी, केंवि तुझें अनन्त शतकें दिव्यत्व सङ्गोपणें—
—माझ्यासाठिं नव्हेच—काव्यरचना ह्या हेतुच्या कारणें.
काळा! ये, तव शस्त्र चालवि तरी; त्याची बघूं तीक्ष्णता.
काव्यस्मारक हें–न सुन्दर ठरो–तूतें न ये नाशितां!

१०

अन्धारांत मिटून नेत्र पडतों जेव्हां बिछान्यावरी
दृष्टीचा उपयोग सत्य मजला तेव्हांच होतो परि.
देखावे अगदींच अप्रिय दिनीं दैवीं असे पाहणें
काळोखांत खरेंखुरेंच नयनां दिव्यत्व तें लाभणें.
घेतां नेत्र मिटून तापस तुझी मूर्ती दिसूं लागते
काळोखास रविप्रकाशसम ती तेजस्विता लाभते.
झालें सार्थक वाटतें मज जिला हृन्मन्दिरीं स्थापुनी
ती तूं येथिल पोकळींत वससी मद्दैन्यसंहारिणी !
देवी ! सोज्ज्वल मूर्तिनेंच तुझिया मत्स्वप्नसाम्राज्यही
जातें शोभुनि; काय दृश्य असलें लाभेल मातें दिहीं ?
पञ्चत्वांतिल मच्चिदंश रमुनी जातो तुझ्या पूजनीं
वाटे पार्थिवतेविना न मज कां अस्तित्व लाभे जनीं.
व्यापारांतिल सृष्टिच्या दिवस जो वाटे तमिस्रा मला;
सृष्टीची रजनी मला दिन, तदा व्यापार माझा खुला.

काव्य ३८२

११

“आम्ही थोर कुळांतले” मिरविती कोणी असें भूषण,
कोणी वैभव आपुलें, निज कलानैपुण्य कोणी जन,
पोषाखांतील छानछोक अपुला, सामर्थ्य दण्डातलें,
हौशीनें पशुसङ्ग्रहामधिं कुणी सर्वस्वही वेंचिलें.
कोणी लेखणि आपुली मिरवितो, भाला कुणी आपला
वाक्चातुर्यचि भूषणावह कुणा, पुष्पीं कुणी रङ्गला
अन्यांचीं दुबळीं मनें विरमती ज्या सौख्यभोगामधीं
माझें मानस ना चुकून वळतें मार्गाकडे त्या कधीं.
ती सञ्जीवनि, कल्पवृक्ष अथवा उच्चैश्रवा, नन्दिनी,
वाटे तुच्छ गजान्तवैभव, गुरू देवादिकांचा मनीं.
स्निग्धालोककटाक्ष देवि, तव जो मत्सौख्यसर्वस्व तो
‘सौख्यें सर्वच पावलीं’ तव कृपालोभांत मी मानितों.
प्रीतीला तुझिया मुकेन जरि—हें होऊं नये, जाहलें—
दुर्दैवी मग मी, विलास सगळे मातें जरी लाभले.

१२

देवी ! लोटुं नकोस दूर मजला, दे वास पायीं तुझ्या
आई ! जो चरणीं तुझ्या शुचिपणा तीर्थांत नाहीं दुज्या.
गङ्गा, सिन्धु, सरस्वती च यमुना, गोदावरी, गण्डकी,
कावेरी, शरयू, महेन्द्रतनया, शर्मन्वती, वेदिका,
स्तोत्रें माजविलीं अनेक असल्या तीर्थापगांचीं जरी
सारीं वाटति अर्थशून्य मजला, एका न तूझी सरी.
“ चित्तीं कांहिं न लेश भाविकपणा ऐशा जडा नास्तिका
तीर्थांची महती तशीच शुचिता यावी प्रचीतीस का ”
प्रश्नानें मज या कुणी हिणवितां साङ्गेन मी कीं तया
माझी भाविकता त्वदीय चरणीं तीर्थाहुनि सर्व ह्या
घेतां धावत येउनी तव पदीं साष्टाङ्ग लोटाङ्गण
लाभे श्रेय – मिळेल जें न करुनी सम्पूर्ण तीर्थाटण.

तूं देशील मला जरी ढकलुनी – या भारतीं राहुनी
शिक्षा घोर गमेल हाय मजला ती हद्दपारीहुनी.

१३ ===

पायांपासुनि लोटणें जरि मला, आतांच दे लोटुनी
दिक्कोनांतुनि विश्व जों मजवरी भाले धरी रोखुनी
घाया कोसळुनी गिरी मम शिरीं योजीतसे दैव जों
व्हाया साह्य तयास हात तव-जो इच्छानुवर्ती–सजो.
आकाशांतुनि वज्रवृष्टि अतुला होणार माथां उद्यां
अग्नीची धरतीलही प्रखरता मेघाम्बुधारा, नद्या
वारा कण्टकतीक्ष्णता वरुनिया येईल माझ्यावर
ऐसा माजविणार दैव पुढतीं माझ्यावरी काहुर.
दुक्खांच्या जळवा समस्त रुधिरा शोषून गेल्यावरी
व्हावा रोष तुझा न; फार बरवा तो आज होणें परी.
विश्वांतील समस्त दुक्खकटुता तेणें क्षणार्धामधें
भोगाया मिळुनी कळेल किति तें उग्रत्व दैवामधें.

जीं दुक्खें मजला असह्य गमती या भावि काळांतलीं
त्यांना साहुं शकेन मी जर कृपाहानी तुझी साहिली.

१४

'राहो स्नेह कृपा निरन्तर तुझी देवी ! अभाग्यावरी'
ही स्वार्थी असुनी, न अर्थहि दिसे ह्या मागणीला परी.
प्रीतीचें कळलें स्वरूप, पटली ज्याला पुरी ओळख
लाभे प्रत्युपकार त्यास न जरी, त्याचें न लोपे सुख
प्रीती धन्य खरोखरी विसरवी मानापमानास जी
प्रीती दिव्यच ती जिला दिसतसे स्वर्गीय सृष्टी खुजी
प्रीती तीच अभङ्ग वाटति जिला दुक्खें सुखें सारखीं
प्रीती धन्य खरीच होइ सहजीं स्वत्वास जी पारखी.
ठेवावी मग मीं मनांत मम कां त्वत्स्नेहलाभेषणा ?
मद्भक्ती तुझियावरी अचल जी ऐसा तिला मोह ना
'भानू-मेदिनि-चन्द्र-सिन्धु-सरिता हीं प्रेमरूपें भलीं'
ऐसें बोलति लोक; हीन परि तीं मद्भक्तिनें मानिलीं
अन्तर्यामिं असो नसो तव कृपा; मातें न तल्लोभन.
माझें देवि ! समाधिसौख्य उरलें आतां, तुझ्या हातिं न.

[library stamp]

## पाणबुड्या

अभङ्ग

लोटिली ही कोणी सिन्धूमधें होडी
कधीं पैलथडीं लागायाची ?
कळेना कोठून आलों मी तिच्यांत
सुकाणू हातांत नसे माझ्या
परि पाणबुड्या व्हाया आज्ञापिलें
तेंच चालविलें कार्य एक
दर्या हा तुफानी असो वा प्रशान्त
धन्दा अविश्रान्त चालवीणें !
रात्र चान्दण्याची असो वा ढगाळ
सान्ज वा सकाळ सारखीच !
रोज रोज जातों सिन्धूच्या तळाशीं
शिम्पल्याच्या राशी कवळाया
शैवाल सेवून साठवितों मोती
लागोत हे हातीं कुणाच्याही
" साठविलें मोती नक्षत्रासमान ! "
दुजें समाधान नको कांहीं

९।४।२९

# आग

अभङ्ग

भडकली देवा, आग घरीं दारीं
सापडेना परि पळवाट
घेतां पाङ्घरूण दाह निवाराया
लागे तें जळाया पाठोपाठ
जोडियेलें जें जें उपयोगासाठीं
गन्धकच पोटीं त्यांच्या दिसे
उपसतां वापी शिम्पडाया पाणी
तेलच त्यांतोनि येतें वरी
असह्य होतां हा सारा अतिरेक
होतो अश्रुसेक धाय धाय
हवि अश्रूंचा हा घेऊन अखेर
हाय ! वैश्वानर शमेना कीं
होरपळे काया, गुदमरे जीव
येईना का कींव मृत्यो ! माझी ?

२०।११।२८

# यशवन्त

वृत्त–गीतिका

धनवन्त जो गुणवन्त तो व्यवहारनीतिमधें ठरे
असली जरी क्षणजीवि तत्कृतिची लता झणिं मोहरे
'यशवन्त, विक्रममन्त हा' स्तुतिची अशी कवनाञ्जळी
उधळावया सरसावती किति भृङ्गधर्मिय मण्डळी

दिसते कुणास कुणामधें नमनीय अद्भुतता महा
पटवूं बघे कथुनी जनां 'प्रति येशु राम रहीम हा'
लव तत्कृती फुलवून दावुनि आपुल्या प्रतिभा-बळें
पदरीं तदीयहि ओपितो अवतार-कार्य-यशः-फळें

अथवा प्रभावळ थोर पूर्वज कीर्तिची मिळते कुणा
बिरुदें समस्त परम्परागत दाविती नसत्या गुणा
ललकारिती जन, नौबती झडती पथांतुन चालतां
ध्वज-तोरणीं सहजीं दिसे मग भाविकास यशस्विता

असल्या न वावरतीं पथीं परि जीं चिरन्तन सद्यशें
यश ज्या वरी रहदारिच्या पथिं तो न वाटसरू असे
मळली न पाउलवाट जी दिसते स्वयम्प्रभ ती नरा
उठलीं जरी बहु सङ्कटें तरि वृत्ति होइ न बन्धुरा

अपमान वा उपहास वा अवरोध वाक्शर सोसतो
स्तुति मानितो मदिरेपरी, श्रमसाहसा न जुमानतो
दिसलीं मनोनयनास अस्फुट जीं भविष्य-नभोङ्गणीं
कमनीय उज्ज्वल वाञ्छितें नित तींच लाविति ओढणी
पतनामुळें गुणिल्या बळें द्रुत भीमसा उसळे पुन्हा
च्युति होति ज्यास अलङ्कृती नव, दीपिका इतरेजनां
यश त्यास लौकिकमापनीं नच लाभतां जरि ये मृति
तरि तोच कीं 'यशवन्त' मानुनि त्यास गाइन आरती

२८।११।२८

## सङ्कोच

सुनीत–शार्दूलविक्रीडित

बोलाया गुज ऐसपैस, करुनी हृद्बन्ध सारे खुले
सौख्यें जीं उपभोगिलीं अनुदिनीं राहून एका स्थळीं
त्यांच्या आठवणी पुन्हा उभवुनी आमोद सेवावया
बोलायास उमेदपूर्ण पुढचे सङ्कल्प नानापरी
स्कन्धीं ठेवुन मान, हात धरुनी दाबून हातामधें
लावाया तुळईवरी नजर अन् निःश्वास सोडावया
जोडाया गतकाळ पूल करुनी ऐशा पुनर्मीलनीं
गेहीं बोलविलें मदीय तुजला अत्याग्रहें आदरें.
आला तो क्षितिजावरी दिन तसा तूं माझियाही घरीं
आधीं साङ्गुनि ठेविल्यापरि तुझें झालें मुदें स्वागत
होत्या ठाउक आवडी तव तशी सेवा तुझी जाहली
ऐसा उत्सवपूर्ण तो दिन जसा आला तसा चालला
सङ्कोचें शकलों वदूं न परि मी जें योजुनी ठेविलें
सङ्क्षेपें परि तें निरोपसमयीं अश्रूंत ओथम्बलें

३०।११।२८

## बाणा

जाति–मोहिनी

काय होइ विन्मुख कैचा तरी देवराणा ?
उभे राहुं आम्ही अमुच्या जरी परित्राणा.
कैक सङ्कटांच्या राशी शिरीं कोसळोत
पडो तेंवि लोखण्डाचा तप्त रसस्रोत
तनूभोंवतालीं जळते नाचुं देत पोत
कदर करायाची नाहीं हाच मुळीं बाणा.

चित्तचक्षु सन्तत जागे दक्ष कीं खलाशी
आंत शक्ति होकायन्त्रापरी ध्येयदर्शी
उभीं धीर-वचनें मार्गीं दीपगृहाऐशीं
काय पोंचणार न नौका योजिल्या ठिकाणा ?

योजिली अम्हास्तव त्यानें जरी माळजागा
कसूं कम्बरा फुलवाया तेथ रम्य बागा
विफल यत्न झाले तरिही कधिं न करूं त्रागा
भुलुनि तोच येइल अमुच्या पुष्पपरागांना

लोटिलें तयानें किंवा सिन्धुच्या तळाशीं
रविप्रकाशास्तव तेथें जीव जे अधाशी
खुल्या जगीं आणूं प्रेमें धरुनि त्यां उराशीं
आणि विनवुं 'पावन करुनी प्रभो ! घ्याच यांना !'

दाविली तयानें किंवा जरी बन्दिशाळा
तिथें लावुनी तुळशींचें रोप पुजूं त्याला
खलांच्याहि हृदयीं स्फुरवूं भक्तिचा उमाळा
भासवूं तया हें गोकुळ; नव्हे बन्दिखाना.

६।२।२९

# वृथा निर्माल्य

ओवी

कौतुकाच्या आशीर्वचें अङ्गीं भरोन उल्हास
मूठ मूठ चढे मांस.
आंचवलों परि आतां सुधातुल्य खुराकास
रोज घडती उपास
आतां करावयाच्या लुटी नव्या नव्या कुणासाठीं?
कुणासाठीं आटाआटी?
कुणापुढें ठेवायाचा आणिलेला नजराणा
नसे सिंहासनीं राणा!
जरी गुम्फिती हे हात रोज नव्या नव्या माळा
परि केवळ तो चाळा
कौतुकाच्या नजरेचें जलसिञ्चन लाभतां
ये न तयां मळूलता
फुलेलांचे आतां कोणीं जरी ओतिले रान्जण
तरि राहतील म्लान
प्रभूजीच्या पूजेमाजी ज्यांचें जीवितसाफल्य
होती वृथाच निर्माल्य

१४।२।२९

# बोगद्यांत

जाति–अवनी

कुठवर ही थाम्बणार बोगद्यांत गाडी !
कां न तातडी करून जाइ ही अघाडी ?

पूर्विचें नि पुढचें तें
विश्व रम्य मज दिसतें
आज लाभलींत इथें
मात्र हीं खुराडीं !

स्नेहाचे विमल किरण
तेथ देति आलिङ्गन
तिमिर येथ थयथयून
मारितो कुऱ्हाडी.

लुटुनि तेथ सुमनगन्ध
लावि उटी पवन मन्द
स्थळ हें परि धूरबन्द
जेवि तीं धुराडीं.

मायेची करि छाया
देइ फळें सेवाया
कटि-खान्दीं क्रीडाया
येथ न ती झाडी

खाउनि अन्धार धूर
खडक मात्र भंवतिं क्रूर
बघतां दडपेच ऊर
    गोठते धडाडी.
करि न चालका, उशीर;
कळ फिरवी, ने बाहिर.
जावयास मी अधीर
    आपुल्या बिऱ्हाडीं

१७।२।२९.

# आशीर्वाद

जाति–" मनमोहन " सारखी.

तुज द्याया आशीर्वादा मी उचलूं केंवि हात ?
पुष्पिता लता उद्यानीं
घालितां तिला मी पाणी
तेथल्या तेथ ती होई अविलम्बें भस्मसात

करिं काञ्चनरज हो वाळू;
मग केंविं तुला कुरवाळूं ?
जाईल काळवण्डूनी तव कान्ती जन्मजात.

जरि वाटे तुज कवळावें
मस्तका तुझ्या हुङ्गावें
परि उधाण वात्सल्याचें मी हटवी आंत आंत

नभिं नक्षत्रांची शोभा
धरि मी न पहाया लोभा
निखळतील मम नजरेनें, भय नान्दे मानसांत

म्हणुनिया–जरी मी वाञ्छीं–
आरती न धरि नयनांची
मग अन्तर्मुख ती जाळी जरि जीवा स्नेह-वात !

उल्हास उकळतो जेथें
सुखपूर्ति खिदळते जेथें
प्रगटून कशाला तेथें मी पसरूं काळरात ?

तूं सजसी व्योमविहारा
जा विहङ्गमा परभारा
अणु-अणूंत दूषित माझ्या वास्तव्यें येथ वात

माङ्गल्य मूर्त होवोनी
दिग्विजयें ये परतोनी
अस्पृश्य तोंवरी येथें मी बसतों बघत वाट

थबथबून ये अमृतानें
आणि त्या तुझ्या स्पर्शानें
दे तीर्थरूपता मातें साम्प्रत जी शब्दमात्र

७।४।२९

# सम्पादणी

जाति–मुद्रिका

मी वळतों तुझिया घरा असें देखुनी
किति उठुनी तत्परतेनें स्वागता येसि हरिखुनी
आवरून उत्सुकतेस मागुती परि
कडि धरून झोपाळ्याची थबकसी ओसरीवरी

आणिसी खाद्य पेय जें मला आवडे
द्यावया माझिया हातीं तूं स्वयेंच सरसी पुढें
परि आखडुनी निमिषांत हात आपुला
बन्धूस देसि या रीतीं कीं प्रथम मिळावें मला

तूं उठसी बससी जासि पुन्हा थबकसी
पाङ्गतां इतर जन कांहीं मग बोलाया वाञ्छिसी
बोलतां बोलतां मधेंच होसी मुकी
दाटतें धुकें नयनीं तें पसरतें कपोलीं मुखीं

जे मनांत उठती तरङ्ग अवरोधिसी
प्रतिबिम्ब पुसट परि त्यांचें आननीं दिसुन ये मसी
मज जरि ये अन्दाजतां काय तुज हवें
बोलवे न तुज तें जैसें मज तें न तुला देववे

असमर्थपणा मम हाय पुरा जाणुनी
निरपेक्षपणाची खोटी करसी मग सम्पादणी
हरवलेंच कांहीं नाहिं असें दाविसी
अन् तुझी समञ्जसता ही दे अधिकचि कासाविसी

परि स्वतन्त्र तूं, परतन्त्र पामरावरी
पतकरि न, विसम्बुन वाया, नैराश्यपूर्ण शर्वरी.

शान्तता मला लाभुं दे एक एवढी
कीं विदीर्ण नच झाली या बाभळीवरी वावडी

८।४।२९

## बाणांच्या शय्येवर

जाति–माधवकरणी

क्षणोक्षणीं भावना ज्यावरी अनेक उसळून
घालिती प्रचण्ड थैमान
ऐसें माझें हृदय – जाहलें जणु रणमैदान
पूर्विचें कुरुक्षेत्र जाण

इमान राखायास्तव लढलों; लढलों आजवरी
झेलिले कैक उरीं बाण
शर्थ दाविली पराक्रमाची; अखेर आज परि
जाहलों हतबल हैराण

अपमानाचे उपहासाचे निष्कारण घाव
मनानें मुकाट परि गिळिले
अकलङ्कित हें ब्रीद राखिलें–अमित लपण्डाव
कुणी जरि कितीक दाखविले.

ज्यांच्या काजीं राबविली तनु विद्या आमरण
असे कीं नसे त्यास चाड
कुणास ठावें ? परन्तु पोटीं एक समाधान—
सेविला कधिं न मार्ग आड.

असो ! अतां नच शस्त्र पेलवे; उभें न राहवतें
वाञ्छितें शरीर पहुडाया

सुखदुख्खांच्या स्मृती तीक्ष्ण कीं रुतलेले शर ते
जिवाला तीच होय शय्या.
शरतल्पीं या मला पडूं दे—मी इच्छामरणी—
नभींच्या मोजित या तारा !
कोण धनञ्जय शरसन्धानें तृषाक्रान्त वदनीं
शान्तविल सोडुनि जलधारा ?

१५।४।२९

# अतिथिदेवा

अभङ्ग

माझिया घरची चटणी-भाकर
    मानितां साखर-तूप-रोटी
जरी अन्थरील्या चिरगुट-चिन्ध्या
    मऊ गाद्या-गिरद्या मानीतां त्या
मिणमिण जळे क्षीण सान्जवात
    म्हणता कीं स्नात कौमुदींत
अतिथि-देवा ! ही तुमची भलाई
    जिनें लोहाचेंही होय सोनें
तुम्हींच ना प्रेमें कण्या ओरपून
    गोड सुधेहून सिद्ध केल्या ?
धुतल्या थाळीची तुम्हींच ना शाक
    सेवूनीया भूक भागवीली ?
चोखलेलीं बोरें मिटक्या मारीत
    खाऊनिया तृप्त झाला नाथा !
म्हणूनीया देवा, तुमच्या स्वागता
    काय करूं -- चिन्ता वाटते ना
माझ्या घरांतील रित्या उतरण्डी
    जातील वोसण्डी तुम्ही येतां

१७।४।२९

## रे पतङ्ग !

जाति–अवनी

उन्च उन्च रे पतङ्ग ! घेइ तू भरारी
काचतात हात जरी सावरून दोरी
पृथ्वीच्या नियमांनीं
पाय बद्ध मम दोन्ही
जखडिलें न तुज त्यांनीं
तोंच घे हुशारी.

दुनियेचें हें शिवार
बान्ध कुम्पणेंच फार
स्वैर कुठुनि मग विहार ?
कोण्डमार सारी !

ज्या जगांत मम निवास
कुठुनि तेथ गुणविकास ?
भंवतिं दरवळे कुवास
येतसे शिसारी.

कर्तृत्वीं नव किमया
अन्यांची;—त्यांतुनिया
विक्रम-यश कवळाया
बिलगती भिकारी.

पेटविल्याविण जळती
फुङ्कता न मालवती
जेथं दिव्य दीप-तती
मार्ग तो सुधारी

आलेला मम जीवा
कोम्भच तू राजीवा !
नभिं विकास तव व्हावा
हीच हौस भारी !

मग जरी बसेल ताण
साहिन आमरण जाण
हें तुज उत्साह-गान
होउं दे शिदोरी !

३०।४।२९

## कुरकूर

जाति–शूर्पणखा

'ते' हवेत माझे मला
सखे ! परि भंवतिं सदा गलबला ॥ ध्रु०॥

हे मधुप फुलांभोंवती
डोलती जसे गुञ्जती
लोभले तेंवि सोबती
तयांचा ओघ न कधिं आटला

हीं कितीक बोलावणीं
घडि मुळीं न जाई सुनी
परि विचार न करी कुणी
किती हा असेल जिव भागला

ती मोहक बैठक जनीं
सुम लतिकापर्णांतुनी
खुलतसे हिरा कोन्दणी
जेंवि कीं नभांत इन्दू-कला

हें विभव असें आगळें
मज हेंहि न का ग कळे ?
परि इतरां मिळतीं फुलें
असोनी दारीं तरु बहरला

बघ खुशाल मोत्याहि तो
त्या अङ्कावर झोपतो
हिणवितो जणू चिडवितो–
हि मेला खट्याळ मुलखांतला !
निर्वेध असावें जिणें
दिन रात्री व्यापाविणें
चिर सङ्गत अशि लाभणें
कधीं ग ? छाया जशि वस्तुला

२१।५।२९

# सोड शिथिलता

अजुनि उणींवा किती तरी
सोड शिथिलता शीघ्र तरी
कालच रात्रीं निजतां वेळीं
हळद जराशी तुवां प्राशिली
गौर कान्ति कीं प्राप्त जाहली
बघसी रवि येतांच वरी.

फुङ्कर मारुनि पाटीखालीं
आम्ब्याची टवटवित डहाळी
दाविलीस फळभारें लवली
शाश्वत का ही जादुगिरी ?

सुलभ सिद्धि जी सुरवातीची
क्षणभङ्गुर ती चञ्चल वीची
भगिनी निकटस्थिता च्युतीची
ढिलाईस का घात दुरी ?

सिद्धि नव्हे, ही मुग्ध मोहिनी
करिल पराङ्मुख तपापासुनी
ब्रह्मर्षीपद तरी कोठुनी ?
श्वानपदांत समाप्ति तरी !

२५।५।२९

## माझे धनको

जाति–फुलवेल

कर्जबाजारी। जाहलों पुरा संसारीं
प्रकाश ज्यांचा फुलला सदनीं
सुखद मला ज्या रविचन्द्राहुनि
चन्द्रज्योति त्या तुझिया नयनीं
घोर अन्धारीं। असतों ना तरि संसारीं

सङ्कल्पांचीं माझ्या यानें
सञ्चरती जीं व्योमपथानें
गती तयांना तव शब्दानें
ना तरी सारीं। गन्जती हृदयकासारीं

बाग बहरला भंवतीं सुन्दर
कारण विलसे वसन्त त्यावर
सुहृज्जनांचा स्नेह निरन्तर
निबिड कान्तारीं। ना तरी वसति चौ-पारीं

तीव्र विषमता येउन सन्मुख
धैर्य होउनी द्रुत मरणोन्मुख
मन व्हायाचें ध्येयपराङ्मुख
जरि न चैतन्यें। शिशुहास्य-सुधा-पर्जन्यें



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४२३५

नसून कांहीं मुळांतलें मम
तुम्ही मानितां मज देवासम
ऐसें तुमचें कौतुक अनुपम
खापरी-पोटीं । जें पाहि हिऱ्यांच्या कोटी
सङ्क्षेपातें यापरि देतां
काय लागतें माझ्या हाता ?
ऋणकोपण ही माझी मत्ता
अशा संसारीं । मी पुरा कर्जबाजारी

२९।८।२९

## कल्पलतेस—

[ चाल–तूं टाक चिरुनि० ]

किति थोर तुझे उपकार। तयां नच पार
मी रङ्क जन्मता असुनि
देसि तूं तख्ताचा अधिकार ॥ ध्रु०॥

कुसुमें किति हीं दिन-रातीं
पायदळीं चुरलीं जाती
त्यांमधेंच माझी गणती
परि शिरोधार्य जाहलों
लाभतां तुझी कृपा आधार.

हुङ्गणें, क्षण उरीं धरणें
होतांच रुक्ष झिडकरणें
गति अशीच माझी होणें
निर्माल्य तुझा मी म्हणुनि—
पावलों जनीं परी बडिवार.

लाविलें पेय जें ओठीं
जाहलें जहर तें पोटीं
तैशीच आग ही भंवतीं
परि तुझ्या कृपेनें होइ—
सह्य हा दाह जरी अनिवार.

अनिरुद्ध ठेवुनी हात
मणिमोत्यांची खैरात
वाञ्छितों करूं जगतांत
ठेवील तुझ्यासम कल्पलता
मम कैंवि रितें भाण्डार ?

हा वेष जो तुवां दिधला
शोभला पाहिजे मजला
काळजी ही तुझी तुजला
म्हणुं नये कुणी "बसविली—
कोन्दणीं कैंवि तरी ही गार !"

२७।९।२९

## मायाविनीस—

ओवी

काञ्चनाच्या मृगापरि पुढें पुढेंच तू जाशी
गुन्तूनीयां मोहपाशीं
तुझ्या मागें मागें आलों किती किती तरी दूर
सोडूनीया परिवार.
दाखविसी चाळवण्या, देसी जवळ येऊन
अङ्ग परन्तु चोरून
निसटसी विजेऐशी, तोण्डघशीं मला देसी
वञ्चना कां क्रूर ऐशी ?
निघतांना परिवार—शेणामेणाच्या बाहुल्या
मज रोधाया धावल्या
तुझ्या छन्दें वेडावल्या वृत्तींनीं त्या लाथाडुनी
आलों घोर रानीं वनीं !
तुजलागीं विन्धायातें शरसन्धान योजून
मज लागेल ना क्षण
कलेवर काय करूं ? तुज जिवन्त जिङ्काया
शिणवितों प्राण काया.
पाठशिवणीचा खेळ पुरे झाला मायाविनी !
करी हातमेळविणी.

२४।१२।२९

# कधिं येशिल?

जाति-मुद्रिका

तव आगमनें हें सदन कधीं मङ्गले !
होईल सुशोभित ? माझें सान्धेल हृदय भङ्गलें ?
आनिमिष लोचनें वाट तुझी पाहतों
सिद्धता स्वागताची ही हरघडी सज्ज ठेवितों

कधिं येशिल अवचित उषा नभीं उगवतां
घालितों सडा राङ्गोळी अङ्गणीं म्हणुन मी स्वतां
परि ठिपक्यापरि सङ्कल्प विखुरलें मनीं
काढील दिव्य राङ्गोळी तुजविना कोण त्यांतुनी ?

कधिं येशिल अथवा ऐन तिन्ही सान्जची
मी सान्जवात लावोनी पाहतों वाट रोजची
परि मदन्तरा वाढती निशा ग्रासिते
उजळील चन्द्रिके त्यातें तुजविना कोण गे स्मितें ?

शिणशील चालुनी येथवरी राजसे !
धारोष्ण दुवक्ता पेले ठेवितों भरुन गोरसें
मम पाङ्गुळल्या ज्या क्षीण उमेदी मनीं
का अन्य तयांची कोणी तुजवांचुनि सञ्जीवनी ?

आवडी तुझ्या जाणुनी पहा जमविल्या
आरास-वस्तु सदनीं या, सुमलतिका परसांतल्या
परि कळाहीन त्या हाय किती जाहल्या !
त्वत्स्पर्शसुखास्तव साऱ्या दिसती जणु आसावल्या
परिवार, पसारा, जिणें फोल तुजविना
स्वामिनी ! येउनी यांना देशील कधीं जीवना ?

लागले एकसारखे नेत्र तुजकडे
त्वत्प्रतीक्षेविना धन्दा जीवास दुजा नावडे
जरि भारावुनि झाकल्या कधीं पापण्या
अवधान रन्ध्रही देती चाहूल तुझी ऐकण्या
चाहूल जरा लागतां जीव उमलतो
परि तुझी न ती कळतां हें नैराश्यें कोमेजतो
चालते उघड-झाप यापरी सारखी
भङ्गल्या हृदयवीणेची येउनी जुळवि तार कीं
तव अनुग्रहें मी धन्य धन्य होउनी
न्हाणीन चरण अश्रूंनीं सौभाग्यदायि नन्दिनी !

६।९।२९

## महाराष्ट्र-गीत

वृत्त—स्रग्विणी

वन्दितों हे महाराष्ट्र-माते ! तुला
तूझिया गायनीं स्फूर्ति दे या मुला

जागतीं दैवतें, गाजतीं गोपुरें,
व्योम-चुम्बी उभीं भव्य हीं मन्दिरें;
कीर्तनें चालती, नर्तनें रङ्गती
आणि दिण्ड्या पताका किती डोलती.
छेडिती भक्तिनें एकतारी कुणी,
गाति जात्यावरी गोड ओव्या कुणी;
सारखी भक्तिची लाट हेलावते,
भासतो हा महाराष्ट्र वैकुण्ठ तें.

कोयना, वारणा आणि इन्द्रायणी
तेंवि कृष्णादि या मूर्त मन्दाकिनी
वाहुनी नेति कीं वाहुनी पातकें
तो महाराष्ट्र हा पुण्य जेथें पिके.
नान्दले जेथ सौमित्र, सीता-प्रभु
दण्डकारण्य हें ही महाराष्ट्रभू.

तिष्ठला, कष्टला रुक्मिणीचा पती
धन्य तेणें महाराष्ट्र हा भारतीं.

खौळले सिन्धुसे, धावले व्याघ्रसे,
शत्रु-घूकाप्रती जाहले सूर्यसे,
नाममात्रेंहि जे बागुलासारखे,
कौस्तुभाची द्युती ज्यांपुढें ना टिके,
वैनतेयापरी जिङ्कुनी पीयुषा
दास्यमुक्तीसवें साधिती सद्यशा,
अञ्जनीबाळसे राष्ट्रकार्यांत जे
वीर ऐसे महाराष्ट्र-माते ! तुझे.

रामदासी गिरा दिव्य सञ्जीवनी,
वेद आले रहाया अभङ्गांतुनी,
देव-दैत्यापरी काळसिन्धूप्रती
मन्थुनी काढिती दिव्य रत्नें किती
कालही आजही पुत्र ऐसे तुझे
ज्यामुळें मेरुमान्दार होती खुजे,
घेत लोटाङ्गणें सिन्धुलाटा महा
स्तोत्र गाती जया तो महाराष्ट्र हा.

काय माझी तिथे तोकडी वैखरी !
तेवि ही लेखणी कष्टवूं कां तरी ?
अल्प सेवा तरी होउं दे हातुनी
याचितों हे महाराष्ट्रभू ! वन्दनीं.

४१५१२९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४२३५

REFBK-0004235
REFBK-0004235